# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ


कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, | दूरध्वनी क्रमांक कार्यालय: ०७१३२–२२३१२०

गडचिरोली–४४२६०५ | ईमेल : director.boee@unigug.ac.in


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./४४४६/२०२६     दिनांक :६/०२/२०२६

# अधिसुचना

महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजन करण्याबाबत.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाचा तेरावा दीक्षांत समारंभ दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी संपन्न झालेला असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ चा एकरुप परिनियम क्र. ४/२०१८ नुसार विद्यापीठाने आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिण्याच्या आत संबंधीत सर्व महाविद्यालयांनी महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करावयाचे आहे. त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे संलग्नीत करण्यात आलेले असून त्यानुसार पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ घेण्यात यावा.

6/2/2026

(डॉ. पी.ए.पोटदुखे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी:– १ मा.कुलगुरू महोदय यांचे स्विय सहायक,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
२. मा.प्र–कुलगुरू महोदय यांचे कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.
३. मा.कुलसचिव महोदय यांचे कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.

Scanned with OKEN Scanner

# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजनबाबत

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०२६ (२०१७ चा महा ६) मधील कलम ७२ च्या पोट कलम (१०) तसेच कलम १३० द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने दीक्षांत समारंभाच्या संबंधात २०१८ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ विहीत केलेला आहे. महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग चार — ब मधिल मुद्दा क्र. ८ नुसार विद्यापीठाने आयोजित केलेल्या दीक्षांत समारंभानंतर एका महिण्याच्या आत संलग्न महाविद्यालयाकडून अथवा मान्यता प्राप्त परीसंस्थेकडून पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यात येईल, असे नमूद आहे त्यानुसार महाविद्यालय स्तरावर पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ खालील मार्गदर्शक तत्वाप्रमाणे आयोजित करावा.

- विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानंतर एका महिण्याच्या आत महाविद्यालयानी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करण्यात यावा.
- पदवी प्रमाणपत्रे महाविद्यालय स्तरावरुन विद्यार्थ्यांना वितरीत करण्याची व्यवस्था संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्यांनी करावी.
- पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानंतर महाविद्यालयाला एकत्रितपणे प्राचार्यांनी अधिकृत केलेल्या विशेष दुताकडे विद्यापीठा कडून हस्तांतरित करण्यात येतील.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे प्रमुख अतिथी शिक्षण क्षेत्राशी निगडीत असावी.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ हा स्वतंत्र अथवा महाविद्यालयात होणाऱ्या इतर शैक्षणिक कार्यक्रमासोबत घेण्यात यावा.
- महाविद्यालयामार्फत पात्र विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आटोपल्यानंतर त्या तारखेपासुन पंधरा (१५) दिवसाचे आत संचालक, परीक्षा व मुल्यमापने मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, यांना छायाचित्रासह सविस्तर अहवाल सादर करावा.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ सुरु होण्यापूर्वी विद्यापीठ गीत, राज्यगीत व समारंभ आटोपल्यानंतर राष्ट्रगीत घेणे बंधनकारक राहील.
- पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाकरीता येणारा खर्च संबंधीत महाविद्यालयांनी करावयाचा आहे.
- विद्यापीठाचा केंद्रबिंदु विद्यार्थी असल्याने सदर उपक्रम हा विद्यार्थ्यांच्या हिताचा व सन्मानाचा दृष्टीने घेण्यात येणार असल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ आयोजित करणे अनिवार्य आहे.

(डॉ. पी.ए.पोटदुखे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner